# लोकमत

शुक्रवार ५ ऑक्टोबर २०१२









## हजार वर्षांनी येणार गांधीजयंतीचा असा योग

(02-10-2012 : 01:51:37) Share Like 3k



सचिन दिवाण

मुंबई, दि. १ - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती देशभरात आणि विदेशातही विविध प्रकारे साजरी होत असते. पण अमेरिकेतील एका प्राध्यापकाने संख्यांच्या माध्यमातून गांधीजींचे स्मरण करताना यंदाची गांधीजयंती विशेष असल्याचे दाखवून दिले आहे.

यंदा गांधीजींच्या जयंतीची तारीख २-१०-२०१२ अशी वैशिष्ट्यपूर्ण असून उलट-सुलट कशीही वाचली तरी २१०२ आकडे येतात. तारखेचा हा मेळ परत तब्बल १००० वर्षांनी म्हणजे २ ऑक्टोबर ३०१२ रोजी येणार आहे. तेव्हाही २१०३०१२ ही संख्या उलटसुलट वाचली तरी सारखीच राहणार आहे.

यंदाची गांधी जयंतीची तारीख २ ऑक्टोबर २०१२ म्हणजेच २-१०-२०१२ अशी आहे. वरवर पाहता त्यात काही विशेष वाटणार नाही. हे अंक ओळीने लिहिले असता २१०२०१२ असे दिसतात. सरळ किंवा उलट्या दिशेने कसेही ते वाचले तरी क्रम एकच म्हणजे २,१, ०, २ असाच येतो. वेगळ्या भाषेत सांगायचे तर या संख्येत सममिती आहे. अशा प्रकारे उलटसुलट कसाही वाचला तरी समान राहणा-या संख्येला किंवा शब्दाला पॅलिण्ड्रोम म्हणतात. यंदाच्या गांधी जयंतीबाबतची ही गंमत अमेरिकेतील ओरेगॉन येथील पोर्टलँड विद्यापीठातील इलेक्ट्रिकल इंजिनिरींगचे प्राध्यापक अझीझ इनान यांनी व्यक्तीश: दूरध्वनी करुन 'लोकमत'च्या निदर्शनास आणून दिली. गांधीजींच्या जयंतीची पुढील तारीख पॅलिण्ड्रोम ठरण्याचा प्रसंग तब्बल १००० वर्षांनी म्हणजे २ ऑक्टोबर ३०१२ रोजी येणार आहे. तेव्हाही २१०३०१२ ही संख्या उलटसुलट वाचली तरी सारखीच राहणार आहे.

इनान यांना संख्यांशी खेळ करण्याचा छंदच असून त्यांनी अनेक महत्त्वाच्या तारखांच्या बाबतीत अशा गमतीजंमती शोधून काढल्या आहेत. यासंबंधी त्यांचे लिखाण अमेरिकेतील अनेक वृत्तपत्रांतही प्रसिद्ध झाले आहे. यंदा गांधीजींची १४३ वी जयंती असून त्यासंबंधी संख्यात्मक विश्लेषण करणारा लेख त्यांनी आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला असून त्याचा पूर्ण मजकूर http://bit.ly/PFDztF या वेबलिंकवर उपलब्ध आहे.

इनान यांची गांधीजींबाबतची उत्सुकता केवळ संख्यात्मक नाही तर गुणात्मकही आहे. जगाच्या सर्वच प्रदेशांत हिंसाचार वाढीस लागत असताना गांधीजींचे अहिंसेचे तत्वज्ञानच उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे इतक्या वर्षांनंतर गांधीवाद आजही प्रस्तुत किंवा समयोचित आहे. मात्र जगभरच्या तरुणांना त्याचे महत्व पटवून देणे हे आव्हान असल्याचे इनान यांनी सांगितले. त्याचसाठी आपण अशा प्रकारे लेख लिहून गांधीजींच्या कार्याबद्दल नव्याने जागरुकता निर्माण करत असल्याचे इनान म्हणाले. मार्टिन ल्यूथर किंग यांनी गांधीजींपासूनच प्रेरणा घेतली होती. अमेरिकेतील विद्यापीठांत चालणा-या धर्मशास्त्रासंबंधी अभ्यासक्रमांत गांधींच्या तत्वज्ञानाचाही अभ्यास केला जातो. त्यात अजूनही अमेरिकी विद्यार्थ्यांना रस आहे आणि तो धर्मातीत आहे, असे इनान यांनी आवर्जून सांगितले.

"हजार वर्षांनी येणार गांधीजयंतीचा असा योग" या बातमीवर आपली प्रतिक्रिया